**L. A. BILL No. XVI OF 2026.**

*A BILL*

*FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SELF-FINANCED SCHOOLS (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2012.*

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६.**

**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १७ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

२०१३ चा महा. १.

एचबी ३०२०–१

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या प्रास्ताविकेची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या प्रास्ताविकेतील, "यथास्थिति, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेत" हा मजकूर वगळण्यात येईल. २०१३ चा महा. १.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये, पोट-कलम (१) मधील,-

(क) खंड (१-क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

"(२-क) "आयुक्त" याचा अर्थ, शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, असा आहे;";

(ख) खंड (झ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईलः-

"(झ) "नोंदणीकृत न्यास" याचा अर्थ, भारतीय न्यास अधिनियम, १८८२, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा याच्या तरतुदींअन्वये धर्मादाय प्रयोजनांसाठी नोंदणी केलेला सार्वजनिक न्यास, असा आहे;"; १८८२ चा २. १९५० चा २९.

(ग) खंड (त) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईलः-

"(त) "शाळेचा दर्जावाढ" याचा अर्थ, मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेचा उच्च प्राथमिक शाळेत, उच्च-प्राथमिक शाळेचा माध्यमिक शाळेत किंवा माध्यमिक शाळेचा उच्च माध्यमिक शाळेत किंवा याउलट क्रमाने दर्जावाढ, असा आहे.".

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,-

(क) पोट-कलम (१) मधील, "प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळा यांसारखी एखादी नवीन शाळा स्थापन करण्याची किंवा, यथास्थिति, विद्यमान शाळेचा, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेत दर्जावाढ करण्याची" या मजकुराऐवजी, "प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा माध्यमिक व उच्च माध्यमिक यांसारखी एखादी नवीन शाळा स्थापन करण्याची किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याची" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (४) वगळण्यात येईल.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम १३ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये, पोट-कलम (२) मधील, "रुपये पाच लाखांपेक्षा कमी नाही पण रुपये दहा लाखांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची" या मजकुराऐवजी, "दहा लाख रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु वीस लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम १८ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मध्ये, "राज्य शासन" या मजकुरानंतर, ", आयुक्त" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

१८६० चा ४५. २०२३ चा ४५. **७.** मुख्य अधिनियमाच्या कलम २० मध्ये, "भारतीय दंड संहितेच्या कलम २१" या मजकुराऐवजी, "भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या कलम २ (२८)" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २० ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची क मध्ये,- सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या अनुसूची-क ची सुधारणा.

(क) नोंद (२) मधील, "प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक" या मजकुराऐवजी, "प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा माध्यमिक व उच्च माध्यमिक" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) नोंद (५) मधील, "प्राथमिक ते उच्च प्राथमिक किंवा उच्च-प्राथमिक ते माध्यमिक किंवा माध्यमिक ते उच्च माध्यमिक" या मजकुराऐवजी, "प्राथमिक ते उच्च प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक ते माध्यमिक किंवा माध्यमिक ते उच्च माध्यमिक किंवा याउलट क्रमाने" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**९.** मुख्य अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची-ग मध्ये,— सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या अनुसूची-ग ची सुधारणा.

(क) नोंद (क) मधील, "प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा यथास्थिति, उच्च माध्यमिक शाळा" या मजकुराऐवजी, "प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) नोंद (ग) मधील, "उच्च-प्राथमिक, माध्यमिक किंवा यथास्थिति, उच्च-माध्यमिक शाळेमध्ये" या मजकुराऐवजी, "उच्च-प्राथमिक, माध्यमिक, किंवा यथास्थिति, उच्च-माध्यमिक शाळेमध्ये, किंवा याउलट क्रमाने" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी ३०२०–२ (२५५-३-२०२६)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६.]**

**[महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. दादाजी भुसे,**
शालेय शिक्षण मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक १७ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई